# तिसरी परीक्षा प्रश्नपत्रिका २०१८

उमेदवाराचे नाव ______________________________ वय ____________

पत्ता ______________________________________________________

परीक्षा केंद्र ___________________________________________________

परीक्षा संचालकाचे नाव ________________________________________

परीक्षा संचालकाची सही ______________________ तारीख _____________

लेखी परीक्षा गुणदान

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | लेखी गुण | एकूण गुण (निम्मे गुण) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| पैकी गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | ८० | ४० |

तोंडी परीक्षा गुणदान

| | प्रार्थना श्लोक | इतर विषयी माहिती | सामान्य ज्ञान माहिती | कविता गाणी बालगीते | श्रवण प्रश्नोत्तरे | वाचन प्रश्नोत्तरे | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | |
| पैकी गुण | ५ | ५ | १० | १० | १५ | १५ | ६० |

एकूण गुण

| |
|---|
| / १०० |

**प्रश्न १. अ) योग्य पर्यायाला गोल करा. Circle the correct answer.** **गुण ४**

| शब्द / अंक | अ ) | ब ) | क ) |
|---|---|---|---|
| नऊशे अडतीस | ९३ | ९३८ | ९८३ |
| सातशे छप्पन्न | ५७६ | ७६५ | ७५६ |
| ७९० | सातशेनव्वद | सत्त्याहत्तर | सत्त्याण्णव |
| ५२८ | दोनशे ऐंशी | पाचशेअठ्ठावीस | ब्याऐंशी |
| एकोणपन्नास | ४९ | ९४ | ५९ |
| तीनशे बत्तीस | ३७२ | ७२३ | ३३२ |
| ४८५ | चारशेअठ्ठाव्वन | चारशेपंचाऐंशी | पाचशेचौऱ्याऐंशी |
| ६३ | त्रेसष्ट | तेहेतीस | छत्तीस |

**प्रश्न क्र. १ ब) कोडे सोडवा व योग्य उत्तराला गोल करा. उत्तर कसे काढले ते रिकाम्या जागेत दाखवा.** **गुण ६**

**Solve word problem and circle the correct answer.** (*Show your work in the area provided using Marathi numbers.)*

- एका बास्केटबॉल टीमला ९५ पॉइंट मिळाले. दुसऱ्या टीमला ४ पॉइंट जास्त मिळाले. तर दुसऱ्या टीमला किती पॉइंट मिळाले?

  अ) पंचाऐंशी  ब ) नव्याण्णव  क ) पंचावन्न

- अवनीच्या कुत्र्याचे वजन ६२ पौंड होते. आता त्याचे वजन ७५ पौंड आहे. तर त्याचे वजन किती पौंडानी वाढले?


  अ ) तेरा  ब )  नऊ  क ) पंधरा

**प्रश्न क्र. २ अ) योग्य शब्दाला गोल करा. Circle the correct word. गुण २**

| | | |
|---|---|---|
|  | रावणाच्या सैनिकांनी मारुतीला _______________बांधले. | • दोरखंडाने<br>• राखीने<br>• कंदीलाने |
|  | झाशीच्या राणीला घोड्यांची _______________ होती. | • भीती<br>• पारख<br>• शिस्त |
|  | विमानातून मुंबईचा _________ खूप छान दिसतो. | • डोंगर<br>• समुद्रकिनारा<br>• राजवाडा |
|  | मातीत पाणी मिसळून________ होतो. | • कडक<br>• गरम<br>• चिखल |

**प्रश्न क्र. २ ब) खाली दिलेला कुटुंबाचा तक्ता बघा आणि दिलेल्या नात्याचे कोणतेही ४ शब्द वापरून, प्रत्येकी एक वाक्य लिहा.** **गुण ८**

**Chose any 4 given words and write one sentence each using the chart below.**




( चुलतबहीण, आत्या, भाची, आतेभाऊ, चुलतभाऊ, मामेभाऊ , मावशी, आजी, नात, मामे बहिणी, मावस बहिणी )

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**प्रश्न क्र. ३ अ) खालील अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखून तक्त्यात भरा. गुण ५**

**Identify correct gender of the underlined words and fill out the chart.**

पावसामुळे हवेत **<u>गारवा</u>** वाढला. **<u>आकाशा</u>**त **<u>इंद्रधनुष्य</u>** दिसले. पावसाचे थेंब पडून **<u>माती</u>**चा **<u>सुवास</u>** दरवळू लागला. बंडूला गरम **<u>चहा</u>** बरोबर थालीपीठ खाण्याची **<u>इच्छा</u>** झाली. ताईला मात्र **<u>कॉफी</u>** बरोबर **<u>बिस्कीट</u>** हवे होते. आईने खमंग **<u>अळूवडी</u>** केली.

| स्त्रीलिंगी | पुल्लिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**प्रश्न क्र. ३ ब) अधोरेखित एकवचनी शब्दांचे योग्य अनेकवचनी रूप असलेले वाक्य निवडून त्या समोरील गोल काळा करा. गुण ३**

**Mark the correct plural form sentence for the underlined singular words given.**

१ <u>चांदणी</u> चमचम करते.

◯ चांदणी चमचमे करतात.
◯ चांदण्या चमचम करते.
◯ चांदण्या चमचम करतात.

२ गावात <u>डोंगर</u> आहे.

◯ गावात डोंगर आहेत.
◯ गावात डोंगरी आहेत.
◯ गावात डोंगरे आहे.

३ रस्ता सरळ आहे.

- ◯ रस्त्या सरळ आहेत.
- ◯ रस्ती सरळ आहेत.
- ◯ रस्ते सरळ आहेत.

**प्रश्न क्र. ३ क) अधोरेखित अनेकवचनी शब्दांचे योग्य एकवचनी रूप असलेले वाक्य निवडून त्या समोरील गोल काळा करा. गुण २**

**Mark the correct Singular form sentence for the underlined plural words given.**

१ भांडी ठेवली आहेत.

- ◯ भांड्या ठेवली आहेत.
- ◯ भांडे ठेवले आहे.
- ◯ भांडी ठेवल्या आहेत.

२ पाहुणे आले होते.

- ◯ पाहुणे आला होता.
- ◯ पाहूण आला होता.
- ◯ पाहुणा आला होता.

**प्रश्न क्र. ४ अ) जोडाक्षरांची फोड करून दाखवा.** **गुण ४**

**Write *Sandhifod* for following conjuncts**

उदाहरण - ग्रह → (ग् + र् + अ ) + ह

| | |
|---|---|
| मार्ग | ______________________ |
| चंद्रिका | ______________________ |
| वास्तव | ______________________ |
| टोपल्या | ______________________ |

**प्रश्न क्र. ४ ब) जोडाक्षरांची फोड दिली आहे, शब्द लिहा.**

**Write words for given *Sandhifod*.** **गुण ४**

| | |
|---|---|
| उ + (न् + ह्+ आ) + त | ______________________ |
| शु + (क्+ल्+अ) | ______________________ |
| नि + स + (र् + ग् + अ) | ______________________ |
| बे + शि+ (स्+ त्+ अ) | ______________________ |

**प्रश्न क्र. ४ क) खाली दिलेले शब्द मराठी लिपीत लिहा.** **गुण २**


**Write following words in Marathi script. (No Translation)**

Example → coffee कॉफी

| | |
|---|---|
| Canada | ______________ |
| Block | ______________ |

**प्रश्न क्र. ५ अ) खालील चित्रातील योग्य दिशा बघून वाक्ये पूर्ण करा.** **गुण ५**

**Complete sentences by filling directions in Marathi.**




१. राधाचे घर पुतळयाच्या ____________ दिशेला आहे.
( आग्नेय, ईशान्य, दक्षिण )

२. सोनालीचे घर राधाच्या घराच्या ____________ दिशेला आहे.
(पश्चिम, पूर्व, उत्तर )

३. बागेच्या ____________ दिशेला शाळा आहे.
(उत्तर, नैऋत्य, वायव्य)


४. बाजाराच्या ________________ दिशेला सिनेमा घर आहे.
(दक्षिण, ईशान्य, पूर्व)

५. रेल्वे स्थानकाच्या ____________ दिशेला बाजार आहे.
(वायव्य, पूर्व, आग्नेय)

**प्रश्न क्र. ५ ब) खाली दिलेल्या आकारात तक्त्याप्रमाणे रंग भरा.** **गुण ५**

**Color the given shapes as per given chart.**

| | |
|---|---|
| **चौकोन** | **लाल** |
| **त्रिकोण** | **जांभळा** |
| **लंबगोल** | **केशरी** |
| **गोल** | **हिरवा** |
| **तारा** | **पिवळा** |



**प्रश्न क्र. ६ अ) घटने प्रमाणे खालील वाक्यांचा क्रम लावा.** **गुण ५**

**Assign the number in the order of event.**

☐ आईने पूजेनंतर नैवेद्य दाखवला.

☐ मग आम्ही गणपतीची मूर्ती आणायला घरातून बाहेर पडलो.

☐ दादाने गणपतीची मूर्ती मखरात बसवली नंतर आम्ही पूजा व आरती केली.

☐ आम्ही सकाळी लवकर उठलो आणि गणपतीच्या पुजेची तयारी केली.

☐ आम्ही गणपतीची मूर्ती घेतली आणि तिला वाजत गाजत घरी आणले.

**प्रश्न क्र. ६ ब) चित्रे बघा आणि त्यावर प्रत्येकी एक वाक्य लिहा.** **गुण ५**

**Write a sentence based on each given picture and season.**

| | | |
|---|---|---|
|  वसंत |  शिशिर |  शरद/ हेमंत |
|  ग्रीष्म |  वर्षा | |

१.________________________________________________________

२.________________________________________________________

३.________________________________________________________

४.________________________________________________________

५.________________________________________________________

**प्रश्न क्र. ७ अ) खालील वाक्यात योग्य अव्यये भरा.** **गुण ५**

**Fill most appropriate conjunction in the sentences below.**

**(कारण, मग, शिवाय, परंतु, इत्यादी, की)**

१. रस्ता मोठा होता, _______________ अपघातामुळे वाहनांची गर्दी झाली.

२. आम्ही सगळे घर आवरले ____________ पाहुणे येणार होते.

३. ताई विचार करू लागली, निळया रंगाचा ड्रेस घेऊ __________ लाल?

४. जेवण झाले, ___________________ मी अभ्यासाला बसलो.

५. संक्रांतीला आजीने तीळ, शेंगदाणे, गूळ, खोबरे _________________ चे लाडू केले.

**प्रश्न क्र. ७ ब) खाली दिलेल्या वाक्यात 'शाळा' या शब्दाचे योग्य रूप वापरून गाळलेल्या जागा भरा. गुण ५**

**(Fill in the blanks using appropriate form of the word 'Shala')**

**(शाळेत, शाळेची, शाळेचा, शाळेने, शाळेला, शाळेचे, शाळेजवळ)**

माझी **शाळा** शहराच्या मधोमध आहे. ____________इमारत चार मजली आहे आणि _____________ एक मोठे मैदान आहे. माझ्या ____________नाव शारदा विद्या मंदिर आहे. माझ्या____________एकूण १२०० विद्यार्थी शिकतात. माझ्या ____________________ मला अभिमान वाटतो.

**प्रश्न क्र. ८ अ) खालील चित्र बघा आणि योग्य रंग छटांना गोल करा. गुण ४**

**See the picture below, circle the appropriate color shade.**



| **घटक** | **पर्याय** |
|---|---|
| **उदाहरण: सूर्य** | तपकिरी, करडा, **पांढरट** (circled) |
| आकाश | निळेशार, काळे, तांबूस |
| डोंगर | निळसर, खाकी, सोनेरी |
| झाडे | गडद हिरवा, फिकट निळा, चंदेरी |
| गवत | पिवळसर, हिरवेगार, पोपटी |

**प्रश्न क्र. ८ ब) इंग्रजीत भाषांतर करा.** **गुण ३**

**Translate in English**

आयुष खूप उशिरा घरी आला. त्याला अजिबात बरे वाटत नव्हते. त्याचे डोके दुखत होते आणि त्याला मळमळत होते. त्याने आईला सांगितले आणि ती त्याला डॉक्टरकडे घेऊन गेली.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**प्रश्न क्र. ८ क) मराठीत भाषांतर करा** **गुण ३**

**Translate in Marathi**

Ajay works hard each day of the week. He wakes up early and goes for a walk. He likes to work out every day. On every Tuesday, he works as a volunteer in school.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________